पिके उगवली, पाहणी अडकली

खरीप हंगाम | जिल्हाधिकारीच ई-पीक पाहणीबाबत अनभिज्ञ

लातूर : खरिपाची पेरणी होताच शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करुन घेण्याचे काम लागते. मात्र, यामधील तांत्रिक अडचणी, क्षेत्राच्या नोंदणीतील अनियमितता यामुळे ही प्रक्रियाच पूर्ण होत नव्हती. त्यामुळे यंदाच्या ई-पीक पाहणी करण्याची जबाबदारी ही पीक पाहणी सहायकांवर सोपविण्यात आली आहे. या प्रक्रियेबाबत जिल्हाधिकारीच अनभिज्ञ असल्याने पुढे योजनेचे काय होणार? असा प्रश्न आहे.

ई-पीक पाहणीच्या माध्यमातून शेतातील प्रत्यक्ष पिकांची डिजिटल नोंद होते. या नोंदीच्या आधारे पीकविमा, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानभरपाई, शासकीय अनुदान, कर्ज तसेच कृषी नियोजनासाठी अचूक माहिती उपलब्ध होते. प्रत्येक योजनेचा लाभ मिळावा आणि अनुदनापासून आपण वंचित राहू नये म्हणून शेतकरी ई-पीक पाहणी करीत होते. वेळप्रसंगी याकरिता पैसे मोजावे लागले तरी शेतकऱ्यांची तयारी होती. आता शेतकरी योजनेपासून वंचित राहू नये म्हणून हीच जबाबदारी महसूल विभागावर सोपविण्यात आली आहे. तहसीलदार, तलाठी हे पीक पाहणी सहायकांची नेमणूक करणार आहेत तर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठकांचे आयोजन करुन ही सर्व प्रक्रिया पार पडणार आहे. आता खरिपातील पिकांची उगवण झाल्यानंतर ई-पीक पाहणीचा मुद्दा समोर येत आहे. शिवाय पीकविमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ही ३१ जुलै असल्याने ई-पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांची घाई सुरु आहे. प्रत्यक्षात मात्र, पीकविमा योजनेत सहभागी होण्यासाठी ई-पीक पाहणी गरजेचीच असे नाही. शेतकऱ्यांच्या हमीपत्रावर देखील या योजनेत सहभाग नोंदवता येणार आहे. पण याबाबत जनजागृतीच नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड गोंधळ आहे. खाला सुरुवात होण्यापूर्वीच जिल्हा कृषी अधिकारी, महसूल अधिकारी यांच्या बैठका पार पडणे गरजेचे होते. पण अनेक गावांत अद्यापही पीक पाहणी सहाय्यकच नेमले गेले नसल्याने या प्रक्रियेत किती तत्परता आहे, हा संशोधनाचा विषय बनला आहे.

> संबंधित यंत्रणेला सूचना दिल्या आहेत. ही प्रक्रिया नेमकी कोणत्या टप्प्यावर आली आहे, याचा आढावा घेऊन सांगतो.
>
> – डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हाधिकारी

पीकविमा योजनेत सहभाग घेता येणार का?

पंतप्रधान पीकविमा योजनेत सहभागी होण्यासाठी ई-पीक पाहणी करावीच असे नाही. शेतकऱ्यांनी दिलेल्या हमीपत्राच्या आधारेही योजनेत सहभागी होता येणार आहे. या हमीपत्रात पेरणीचे क्षेत्र, पिकांची वर्गवारी आदी बाबींचा उल्लेख करावा लागणार आहे. ई-पीक पाहणीची प्रक्रिया ही सुरुच राहणार आहे.

ई-पीक पाहणी नेमकी करणार कोण?

यंदाच्या खरिपापासून ई-पीक पाहणी ही महसूल विभागाकडून नेमलेल्या पीक पाहणी सहाय्यकाकडून केली जाणार आहे. प्रत्येक गावासाठी एक सहायक असेल. नोंदवलेल्या पीक पाहणी नोंदीची १०० टक्के पडताळणी ग्राम महसूल अधिकाऱ्याकडून केली जाणार आहे. याकरिता प्लॉटनुसार त्यांना पैसेही दिले जाणार आहेत.

फडणवीस यांच्या वाढदिनी अस्थिरोग शिबीर

लातूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि पोद्दार हॉस्पिटल एक्सीडेंट अँड ट्रामा केअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी मोफत अस्थिरोग तपासणी, फिजिओथेरपी, मशीनद्वारे हाडाचा ठिसूळपणा तपासणी, दुर्बीणद्वारे शस्त्रक्रिया व सांधेरोपण शस्त्रक्रिया आदी मोफत तपासणी करण्यात येऊन मोफत औषधीचे वाटपही करण्यात आले. सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. इमरान कुरेशी, डॉ. सिद्राम भोसगे, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. फिरदोस इनामदार, डॉ. कपिल घुमरू आदींनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे अधिकारी डॉ. ऋषिकेश खरोळकर, नगरसेवक देविदास काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

न्यायासाठी दोन तरूणींचे जि. प. प्रांगणात धरणे

लातूर : नीट पेपर फुटीच्या पार्श्वभूमीवर, देशभर विद्यार्थी, तरूण आंदोलनाच्या माध्यमातून न्याय मागत असतानाच लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणात शुक्रवारी (दि. २४) दोन तरूणींनी हातात फलक घेऊन ये-जा करणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. आम्हाला न्याय मिळेल का? देशाचा टॅक्स कुठे जात आहे, अशा संदर्भाचे फलक हातात घेऊन दोन तरूणींनी प्रातिनिधीक स्वरूपात धरणे धरले.

आराध्या तांदळे आणि तान्या दोबोले या तरूणींनी प्रातिनिधीक धरणे करून जिल्हा परिषदेत येणाऱ्या, जाणाऱ्या अभ्यंगतांचे लक्ष वेधून घेतले. परंतु, या दोन तरूणींनी धरणेसाठी निवडलेले स्थळ फारसे दखलपात्र नव्हते. ये-जा करणारी मंडळी फक्त त्यांना थांबून पाहायचे आणि पुढे निघून जायचे. या तरूणींनी देशभर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून हे प्रातिनिधीक स्वरूपात धरणे धरली. विद्यार्थी आता न्यायासाठी रस्त्यावर आले आहेत. याची धग आता ग्रामीण भागापर्यंत पोहोचली आहे. गावे, शहरांत विद्यार्थी एकत्र येत आहेत. अन्यायाविरूद्ध तरूण-तरूणी न्याय मागत आहेत.

बँक ऑफ इंडिया
नातं बँकींग पलिकडचं...

वसुली विभाग – सोलापूर आंचलिक कार्यालय
सह्याद्री शॉपिंग सेंटर, जुना एम्प्लॉयमेंट चौक,
सोलापूर –४१३००१. फोन : ०२१७२–२३१९४७६
इमेल : Solapur.ARD@bankofindia.bank.in

रुल ८(६)

स्थावर मालमत्तेचा विक्री सुचना

ई लिलाव द्वारे स्थावर मिळकतींची विक्री नोटीस : सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२, सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल २००२ मधील तरतुद कलम 8(6)

ई लिलाव दिनांक व वेळ : दि.२५ ऑगस्ट २०२६ स.११ ते सायं.५ पर्यंत (भारतीय प्रमाण वेळेनुसार)

तमाम नागरिकांना, विशेषत: कर्जदार व जामीनदार यांना सुचना देण्यात येते कि कर्जदार/जामीनदार यांच्याकडुन येणे रक्कम बाकी पोटी बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांनी नमुद स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला असुन सदर मालमत्तांचा ई–लिलाव द्वारे ''जेथे आहे तेथे, जसे आहे तसे, जेवढे आहे तेवढे '' या तत्वावर दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी विक्रीस काढली आहे ज्याचा तपशील खालील प्रमाणे आहे

अ. क्र.	प्रकार	जागेचे तपशिल	शाखा कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव	मालमत्तेचे सविस्तर वर्णन	राखीव किंमत रु./ अनामत बयाणा रक्कम	एकुण येणे बाकी + व्याज + इतर खर्च	प्रोपर्टी इनस्पेकशन तारीख/वेळ प्राधिकृत अधिकारी नांव व मोबाईल क्र.
०१.	फ्लॅट (प्रत्यक्ष ताबा)	हणमंतवाडी, कासरगांव, लातुर–४१३५१२	**लातूर शाखा** श्री. बापुसाहेब कोंडीबा मंथलवाड (कर्जदार) श्री.सुभाष शंकर पवार (जामीनदार)	फ्लॅट नं.११, तिसरा मजला,घर क्र.६११, सर्व्हे नं.२६९/ए, व्यंकटेशा अपार्टमेंट, कासरगांव, हणमंतवाडी, जि.लातुर–४१३५१२ येथील श्री.बापुसाहेब कोंडीबा मंथलवाड यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण बिल्ट्अप क्षेत्रफळ ८५.५९ स्वचे.मी	रु.१९.१९ लाख इएमडी रु.१,९१,९००/–	रु.१९.५६ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०८.२०२५ पासुन	तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. मद्दीराला रंजीथ कुमार (मुख्य प्रबंधक) फोन : 0217- 2318994; मो : 8639549526 Latur,Solapur@bankofindia,bank,in

सर्व नियम व अटी विषयी जाणुन घेण्यासाठी कृपया पुढील सांकेतीक स्थळांवर भेट द्या https://baanknet.com/eauction-psb/home
Secured website i.e.https://bankofindia.bank.in//and/or https://BAANKNET.com इंग्रजी व मराठी जाहिरातींच्या मसुद्यात विसंगती आढळल्यास इंग्रजी जाहिरातीचा मसुदा अंतिम ग्राह्य धरला जाईल

Jhaveri

दि.२५.०७.२०२६
स्थळ : सोलापूर

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

प्राधिकृत अधिकारी यांचे कार्यालय,
जनता सहकारी बँक लि. धाराशिव शाखा - उदगीर

परिशिष्ट – ४ (नियम ८(१)) **स्थावर मालमत्तेचा ताबा घेतलेची नोटिस**

ज्या अर्थी खाली सही करणार जनता सहकारी बँक लि., धाराशिव चे प्राधिकृत अधिकारी यांनी दि. सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस्, ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ चे सेक्शन १३(१२) आणि रुल ९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन कर्जदार **श्री मनोज व्यंकटराव सुकने यांना दिनांक २६/११/२०२५ रोजी** मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीतील नमुद केलेली बँकेला येणे असलेली **दिनांक ३०/०६/२०२६** अखेरची **रक्कम रु. ९,१६,१३०/- (अक्षरी रुपये नऊ लाख सोळा हजार एकशे तीस)** अधिक त्यावरील पुढील व्याज, इतर खर्च अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून/नोटीस प्राप्त ६० दिवसांच्या आत परत करावी.

सदर कर्जदार व जामिनदार नोटीसमधील नमुद केलेल्या रक्कमेचा भरणा न केल्यामुळे सदर नोटीसीद्वारे कर्जदार व सर्व जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, खाली सही करणार कायद्याच्या कलम १३(४) व नियम ९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करुन नमुद केलेल्या मालमत्तेचा **दि. २१/०७/२०२६** रोजी **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व जामिनदार आणि तमाम जनतेस याद्वारे सुचना देण्यात येते की, त्यांनी मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करु नये आणि सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार केल्यास सदर सुचनेत नमुद रक्कमेवर आणि त्यावरील देय व्याजावर जनता सहकारी बँक लि. धाराशीव शाखा उदगीर चा बोजा असेल.

दिनांक ३०/०६/२०२६ रोजी येणे बाकी रु. ९,१६,१३०/- (अक्षरी रुपये नऊ लाख सोळा हजार एकशे तीस) व त्यापुढील व्याज व इतर खर्च.

तारण मालमत्तेचा तपशील -

मालमत्तेचे प्रकार - निवासी भूखंड मोकळा भुखंड
स्थान / पत्ता - मु. पो. सुकणी, ता. उदगिर, जि. लातूर
सर्व्हे / सीटीएस / गट क्रमांक - ग्रामपंचायत घर क्रमांक ३२ असलेली मालमत्ता
मापे : दक्षिण-उत्तर २५ फुट, पुर्व-पश्चिम ४० फूट एकूण क्षेत्रफळ १००० चौ. फुट
ही मालमत्ता सुकणी गावात स्थित असून तिच्या सीमा खालील प्रमाणे आहेत,

पुर्वेस – पी/ओ. गोपाल दाजी सुकने **पश्चिम** – पी/ओ. श्रीराम सुकने
दक्षिण – पी/ओ. गोपाल रामजी सुकने **उत्तर** – पी/ओ. मारुती आवलकोंडे आणि रोड

मालकाचे नांव - व्यंकट तुकाराम सुकने

तारीख : २१/०७/२०२६
ठिकाण : सूकनी
वेळ : दुपारी ०१.३५ वाजता

सही /-
प्राधिकृत अधिकारी
जनता सहकारी बँक लि., धारशिव शाखा - उदगीर

परिमल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नारायण नगर, लातूर

NEET - 2026 परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी

प्रांजल चौगुले ५९० | अभिनव नाईक ५८८ | मैथिली देशमुख ५५९ | वेदांत हाके ५४० | अपूर्वा मठपती ५०६ | प्रसाद म्हेत्रे ४९४

JEE MAINS - 2026 चे गुणवंत विद्यार्थी

महेश भोसले ९९.०९% | मैथिली देशमुख ९६.७०% | वैष्णवी कटकुरे ९५.९२% | प्रवीण डिगोळे ९४.०३% | यशराज सर्जे JEE Adv. AIR - 18998

MHT-CET - 2026 PCM-PCB ग्रुपमधील गुणवंत विद्यार्थी

प्रसाद म्हेत्रे ९९.११% (PCB) | महेश भोसले ९८.८४% (PCM) | स्वप्नील गरड ९८.३६% (PCB) | वैष्णवी कटकुरे ९८.१०% (PCM) | सात्विक पारसेवार ९८.०६% (PCM) | सृष्टी स्वामी ९७.८०% (PCM) | हरिकृष्णा मुंडे ९७.०२% (PCM) | राजगुरू शिवनाथ ९६.०६% (PCM) | कनकेश्वरी बिरादार ९६.२४% (PCB) | गायत्री बिराजदार ९५.७२% (PCB)

S. S. C. बोर्ड परीक्षा मार्च 2026 मध्ये नेत्रदिपक यश
S. S. C. बोर्ड परीक्षा मार्च 2026 चा शाळेचा एकूण निकाल 100%

100% गुण घेणारे एकूण 6 विद्यार्थी

95% पेक्षा अधिक गुण घेणारे 49 विद्यार्थी
90% पेक्षा अधिक गुण घेणारे 105 विद्यार्थी

तन्मय दातीर 100% | विक्रांत सावंत 100% | मधुरा चिटणीस 100% | वैष्णवी निकम 100% | श्रीयश भुजबळ 100% | ईश्वरी सोनवणे 100% | वेदांत वाघचौरे 99.40% | अनुष्का हांडे 99.40% | श्रेया भगोले 99.00% | आदित्य बिराजदार 99.00% | रोहिणी सुरवसे 98.80% | अक्षरा धाकपाडे 98.60%

ओमकार शिंदे 98.60% | मानवी उपडे 98.40% | वैभव सवासे 98.40% | श्रवण भोसले 98.40% | वैष्णवी पवार 98.00% | प्रणाली गोरे 97.80% | श्रावणी काळे 97.60% | सुमित यादव 97.60% | राजेश सोमवंशी 97.60% | आदित्य मुंडे 97.40% | सागर सोनवणे 97.40% | माधुरी चंदनशिवे 97.20%

बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी

विज्ञान शाखा | कला शाखा

महेश भोसले ८१.८३% | तेजस्विनी गित्ते ८१.६६% | स्नेहा कुलकर्णी ८०.००% | आकांक्षा लंगर ८०.००%

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

प्रा. बाबुराव जाधव, सचिव | प्रा. श्रीनिवास जाधव, प्राचार्य

संपर्क 9423777769

प्रवेश देणे चालू आहे 11 वी, १२ वी विज्ञान व कला शाखा

मोफत फाऊंडेशन कोर्स

● क्रॉप सायन्स ● इलेक्ट्रॉनिक्स ● कॉम्प्युटर सायन्स ● फिजिक्स ● केमिस्ट्री ● बायोलॉजी ● मॅथेमॅटिक्स ● संगीत ● तत्त्वज्ञान ● पाली ● समाजशास्त्र ● राज्यशास्त्र ● इतिहास ● भूगोल

पुण्यनगरीच्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!